जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 SEP 2026
पुढारी

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून रोजगाराच्या नवीन संधी : डॉ. देशमुख

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



डॉ. एम. एस. देशमुख

भारतीय ज्ञान, परंपरा व कौशल्याधारित शिक्षणाचा समन्वय साधून युवा पिढीला भारतीय परंपरांची ओळख करून देण्याबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाशी त्याची सांगड घालणे आवश्यक आहे. यातून विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा हाच प्रमुख उद्देश असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

न्यू कॉलेजमध्ये 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विविध तरतुदींसह क्रेडिट पद्धतीची माहिती दिली. द्वितीय सत्रात डॉ. पी. एस. कांबळे यांनी संशोधन व क्षेत्रीय प्रकल्पांचे विविध टप्पे, अहवाल लेखन व गुणांकनाबाबत मार्गदर्शन केले. दूरशिक्षण विभागाचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत माहिती दिली.

वाणिज्य विभागप्रमुख डॉ. व्ही. के. मारुलकर यांनी कार्यांतर्गत प्रशिक्षणाचे महत्त्व, प्रशिक्षणाच्या संधी, अहवाल लेखन व मूल्यमापन यावर मार्गदर्शन केले. समारोपप्रसंगी प्रभारी प्राचार्या डॉ. अर्चना जगतकर-कांबळे यांनी अडचणींवर मात करून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सकारात्मक पद्धतीने राबविण्याची गरज व्यक्त केली. उपप्राचार्य डॉ. आर. डी. ढमकले यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. मनीषा नायकवडी, डॉ. अनिता मगर-पवार यांनी केले. यावेळी डॉ. जी. आर. पाटील, डॉ. अरविंद घोडके, डॉ. कविता गगराणी, डॉ. अरुंधती पवार, डॉ. विक्रम पवार, डॉ. शरद पाटील, डॉ. संदीप पाटील उपस्थित होते.

21 SEP 2026
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कापड उद्योग सांडपाणी व्यवस्थापणासाठी संजीवनी, शिवाजी विदयापीठाचे संशोधन



डॉ. अविराज कुळदीप



डॉ. के.एम. गरडकर



डॉ. राहुल माने



डॉ. किशोर खोत



डॉ. शरद पाटील

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील संशोधक डॉ. अविराज रामचंद्र कुळदीप आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विकसित केलेल्या 'स्मार्ट कम्पोझिट मटेरियल टेस्टिंग डिव्हाईस'ला भारत सरकारचे पेटंट मंजूर झाले आहे.

डॉ. कुळदीप यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्रज्ञांनी सेमीकंडक्टर फोटो कॅटॅलिसिसचा वापर करून रासायनिक डाय डिग्रेडेशन (प्रदूषित रंग घटक नष्ट करणे) पद्धतीवर आधारित हे उपकरण तयार केले आहे. सदरचे उपकरण ग्राफिटीक कार्बन नायट्रॉइड आणि टायटॅनियम डायऑक्साइड यांच्या प्रगत संयुगापासून तयार केले आहे.

कापड उद्योग व रसायनांच्या कारखान्यांतून बाहेर पडणारे सांडपाणी नदी-नाल्यांमध्ये मिसळल्याने पाण्याचे गंभीर प्रदूषण होते. या

2 1 SEP 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

उपकरणाच्या साहाय्याने पाण्यातील घातक आणि विषारी रंग घटक अत्यंत कमी खर्चात नष्ट केले जाऊ शकतात.

उद्योगांना सांडपाणी प्रक्रियेसाठी हा एक उत्तम पर्यावरणपूरक पर्याय असून सर्वसामान्य नागरिकांना प्रदूषणमुक्त, शुद्ध पाणी मिळवून देण्यासाठी हे संशोधन दिशादर्शक ठरेल. या पेटंटमध्ये डॉ. राहुल मारुती माने, डॉ. किशोरकुमार खोत, डॉ. कल्याणराव गरडकर आणि डॉ. शरदचंद्र पाटील यांचा सह-संशोधक म्हणून सहभाग आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला पूरक अशा या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा फायदा थेट समाजाला होणार असल्याने, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. चव्हाण आणि इंडस्ट्रियल केमिस्ट्रीचे समन्वयक डॉ. गजानन राशिनकर यांनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

**यूके पेटंट आणि स्वच्छता सारथी पुरस्कार**

डॉ. अविराज कुळदीप राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने संशोधन करत असून, सन 2024 मध्ये त्यांना यूके डिझाईन पेटंट देखील मिळाले आहे. याशिवाय कोल्हापूर व इचलकरंजी येथील पंचगंगा नदी प्रदूषणावर त्यांनी केलेल्या उल्लेखनीय आणि शाश्वत कार्यासाठी केंद्र सरकारचा 'स्वच्छता सारथी फेलो' पुरस्कार-2023 त्यांना मिळाला आहे.

**संतोष मिरजे,**
**कोल्हापूर प्रतिनिधी**